ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII | Issue - I | Marathi / Hindi | January - March - 2019

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned by CamScanner

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | तुझे आहे तुजपाशी : एक नाट्यावलोकन<br>**प्रा. नीरज बोरसे** | १-३ |
| २ | पु. ल. देशपांडे यांचे व्यक्तिचित्रणात्मक लेखन<br>**दत्तात्रय त्रिंबक भानुसे** | ४-७ |
| ३ | प्रातिनिधिक स्वरूपाचे नमुने : 'व्यक्ती आणि वल्ली'<br>**डॉ. युवराज धबडगे** | ८-१० |
| ४ | पु. ल. देशपांडे यांच्या विनोदी लेखणाची चिकित्सा<br>**डॉ. यशोद श्रीमंतराव पाटील** | ११-१३ |
| ५ | पु. ल. देशपांडे यांच्या साहित्यातील विनोद : विशेष संदर्भ असा मी आसामी<br>**प्रा. डॉ. मारोती गायकवाड** | १४-१९ |
| ६ | अर्थभिन्नत्वातून पुलचे विनोद<br>**डॉ. विठ्ठल जंबाले** | २०-२३ |
| ७ | भाई व्यक्ती की वल्ली : माध्यमांतर समीक्षा<br>**प्रा. डॉ. दत्तात्रय प्र. डुंबरे** | २४-२८ |
| ८ | पु. ल. च्या साहित्यातील वाङमयीन मूल्यात्मकता<br>**डॉ. कैलास इंगळे** | २९-३३ |
| ९ | पु. ल. देशपांडे: व्यक्ती आणि वाङ्मय<br>**प्रा. संदीप परदेशी**<br>**डॉ. गणेश मोहिते** | ३४-३७ |
| १० | पु. ल. देशपांडे यांचे प्रवासवर्ण लेखन<br>**प्रा. डॉ. शिल्पा म्हात्रे - काकडे** | ३८-४१ |
| ११ | पु. ल. देशपांडे यांचे कथालेखन<br>**सहा. प्रा. रा. ज. चाटे** | ४२-४४ |
| १२ | पु. ल. देशपांडे यांचे साहित्य व कलाक्षेत्रातील योगदान<br>**डॉ. राखी सिद्राम सलगर** | ४५-४७ |





Scanned by CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ९. पु. ल. देशपांडे: व्यक्ती आणि वाङ्मय

**प्रा. संदीप परदेशी**
सहाय्यक प्राध्यापक, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग, बलभीम महाविद्यालय, बीड.
**डॉ. गणेश मोहिते**
सहाय्यक प्राध्यापक, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग, बलभीम महाविद्यालय, बीड.

**प्रस्तावना**

अवघ्या महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे ऊर्फ पु.ल. यांनी आपल्या संपुर्ण जीवनात विविध प्रकारच्या भुमिका यशस्वीपणे पार पाडल्या. यात लेखक, नाटककार, अभिनेता, कथा व पटकथाकार, दिग्दर्शक आणि संगीत दिग्दर्शक अशा अनेक भूमिका त्यांनी आजरामर केल्या. त्यांची कीर्ती लेखक म्हणून असली तरी त्यांची गती या सर्व क्षेत्रात सारखी होती.

गुळाचा गणपती' या 'सबकुछ पु.ल.' म्हणून गाजलेल्या चित्रपटात त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या जवळजवळ सर्वच पैलूंचे दर्शन होते. पुलंनी मराठी माणसाला काय दिले? तर त्याच्या रोजच्या जगण्यातील गमतीदार निरिक्षणे नेमकेपणाने पकडून त्याला खळखळून हसायला शिकवले. पुलंनी पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात आणि सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयात शिक्षण घेतले. ४० च्या दशकात साहित्यक्षेत्रात पदार्पण करण्यापूर्वी त्यांनी महाविद्यालयात शिक्षक म्हणूनही काही काळ काम केले. त्यांचे आकाशवाणी, दूरदर्शन, नाट्य व चित्रपट क्षेत्रातील योगदान महत्वाचे आहे.

ते उत्तम संवादिनी वादक होते, तसेच त्यांनी काही चित्रपटांचे संगीत दिग्दर्शनही केले. दूरदर्शनच्या पहिल्यावहिल्या प्रसारणासाठी पंडित नेहरूंची दूरदर्शनसाठी मुलाखत घेणारे पुलं हे भारतीय दूरदर्शनचे पहिले मुलाखतकार होते.

पु.ल.देशपांडे यांचे वाङ्मयीन कार्य:- देशपांडे यांनी जवळपास ४० वेगवेगळी पुस्तके लिहिली. बटाट्याची चाळ, असा मी असा मी, व्यक्ती आणि वल्ली या पुस्तकांच्या तर २० हून अधिक आवृत्या संपल्या. त्यांच्या लोकप्रियतेचे उदाहरण व साहित्याचा कस जोखण्याचे यापेक्षा कोणते वेगळे परिमाण असू शकत नाही.



Scanned by CamScanner

मराठी वाङमयाचा (गाळीव) इतिहास, खोगीरभरती, पुरचुंडी, नस्ती उठाठेव, गोळाबेरीज, हसवणूक ही त्यांची इतर विनोदी पुस्तकेही गाजली. त्यांच्या आवृत्त्यांचेही विक्रम झाले. त्यांची निरीक्षण शक्ती अफाट होती, हे त्यांनी लिहीलेल्या प्रवासवर्णनावरूनच कळेल. त्यांनी अमेरीका, युरोप, आशियातील अनेक देश पाहिले.त्यात त्यांना प्रवासात आलेले अनुभव त्यांनी अतिशय गमतीदार पध्दतीने लिहिले आहेत. पूर्वरंग, अपूर्वाई, जावे त्याच्या देशा , व्यंगचित्रे आदी प्रवासवर्णने आहेत. त्यांची नाटकेही अतिशय गाजली. वाऱ्यावरची वरात, तुझं आहे तुझपाशी, अमलदार, सुंदर मी होणार, तीन पैशाचा तमाशा, फुलराणी ही काही नाटके आहेत.

याशिवाय त्यांनी लिहिलेली काही व्यक्तिचित्रेही अजरामर ठरली आहेत. गणगोत, गुण गाईन आवडी, मैत्र, आपुलकी यात पुलंनी आपल्या सुहृदांबद्दल लिहिले आहे. पुलंच्या नावावर काही चांगले अनुवाद आहेत. द ओल्ड मॅन ॲण्ड द सी या हेमिंग्वेच्या गाजलेल्या पुस्तकाचे एका कोळीयाने या नावाने पुलंनी केलेला अनुवाद निव्वळ अप्रतिमच आहे.

मनोहर माळगावकरांच्या कान्होजी आंग्रे हे ऐतिहासिक व्यक्तिचित्र रेखाटलेले अनुवादीत पुस्तकही पुलंच्या नावावर आहेत. बटाट्याची चाळ व असा मी असामी चे त्यांनी एकपात्री प्रयोगही बरेच केले. बा. भ. बोरकरांच्या कविता त्यांनी व सुनीताबाई देशपांडे यांनी एकत्र वाचण्याचे कार्यक्रमही त्यांनी केले.

पुलंनी मराठी माणसाला एवढे काही दिले आहे की 'किती घेशील दो कराने' अशी त्यांची अवस्था झाली आहे. साहित्य अकादमी व संगीत नाटक अकादमी या दोहोंचे पुरस्कार मिळवणाऱ्या मोजक्या प्रतिभावंतात पुलंचा समावेश होतो.

पु.ल.देशपांडे यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल महत्वाचे पुरस्कार मिळालेले आहेत. ते असे- 1. पद्मश्री सन्मान , 2.महाराष्ट्र भूषण , 3.साहित्य अकादमी , 4.महाराष्ट्र राज्य वाङमय पुरस्कार , 5.मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष .

पु.लंनी अनेक प्रकारचे साहित्यलेखन केले. यात पुढील साहित्याचा समावेश आहे-

1. विनोदी साहित्य / लेखनसंग्रह-



Scanned by CamScanner

खोगीर भरती, नस्ती उठाठेव, गोळाबेरीज, हसवणूक, खिल्ली, अघळपघळ, पुरचुंडी, मराठी वाङमयाचा (गाळीव) इतिहास, उरलं सुरलं

2. प्रवास वर्णने - अपूर्वाई, पूर्वरंग, जावे त्यांच्या देशा, वंगचित्रे,

3. नाटके व एकांकिका-

तुका म्हणे आता, अंमलदार, भाग्यवान, तुझे आहे तुजपाशी, सुंदर मी होणार, तीन पैशाचा तमाशा, राजा ओयदिपौस, एक झुंज वाऱ्याशी (अनुवाद), ती फुलराणी (रुपांतर), मोठे मासे छोटे मासे, विठ्ठल तो आला आला, आम्ही लटिके ना बोलू, वयं मोठं खोटं (बालनाट्य), नवे गोकुळ (बालनाट्य)

4. अनुवाद- एका कोळियाने, काय वाट्टेल ते होईल, कान्होजी आंग्रे, स्वगत (जयप्रकाश नारायण), पोरवय

5. पत्रलेखन संग्रह - मुक्काम शांतिनिकेतन

6. निवडक पु. ल. - पुढारी पाहिजे, एक शून्य, चित्रमय स्वगत, रेडियोवरील भाषणे व श्रुतिका (भाग एक व दोन) चार शब्द टेलिफोनचा जन्म दाद, रविंद्रनाथ: तीन . व्याख्याने, कोट्याधीश पु. ल., व्यक्ति आणि वल्ली

7. व्यक्तिचित्रे- गणगोत, गुण गाईन आवडी, मैत्र, आपुलकी

8. भाषणे- रसिकहो! सज्जनहो! मित्र हो! श्रोते हो!

**उल्लेखनीय**

- मुंबईच्या 'नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स' (NCPA) या संस्थेत पुलंनी अनेक प्रयोग केले. संशोधकांना आधारभूत होतील असे असंख्य संदर्भ, कलांचा इतिहास, ध्वनिफिती, मुलाखती, लेख आदी बरेच साहित्य पु.लंनी जमा करून ठेवले आहे. मराठी नाटकाचा आरंभापासूनचा इतिहास त्यांनी अशा जबरदस्त प्रयत्नान्ती जमा केला की त्यांच्यावरून स्फूर्ती घेऊन भारतातील अनेक जणांनी त्यांच्या त्यांच्या प्रांतांतील कलांचा इतिहास जमा करून नोंदवायची सुरुवात केली. NCPA च्या रंगमंचावर पु.ल.देशपांडे यांनी देवगाणी, बैठकीची लावणी, दोन पिढ्यांची गायकी असे काही अनोखे कार्यक्रम सादर केले.



Scanned by CamScanner

- पु.ल. भाषाप्रेमी होते. त्यांना बंगाली, कानडी येत असल्याने ते त्या त्या समाजातील लोकांत सहज मिसळत.
- पु.ल. देशपांडे यांच्या जीवनावर 'भाई' - व्यक्ती की वल्ली' या नावाचा मराठी चित्रपट आला आहे.
- पु.ल.देशपांडे यांच्या साहित्यकृतींवर आजवर बरीच नाटके आणि चित्रपट झाले आहेत. शिवाय त्यांच्या साहित्यावर आधारित 'नमुने' नावाची हिंदी मालिका आली असून'सोनी सब' या वाहिनीवर ही मालिका प्रसारित होत आहे.

सारांश

एकुणच पु.ल देशपांडे यांनी साहित्य व कला या क्षेत्रात आपले सर्व जीवन व्यतीत करून सामान्य जनतेला हसवण्याचे काम केले. या सर्व क्षेत्रात पु.ल देशपांडे यांचे साहित्य हे अजरामर आहे.

संदर्भ साहित्य

१) अमृतसिद्धी : (स.ह.देशपांडे, मंगला गोडबोले), पु.ल.देशपांडे गौरवग्रंथ.

२) कसा मी... असा मी... (संकलन, संकलक - डाॅ.नागेश कांबळे)

३) जीवन त्यांना कळले हो ! (सहसंकलक - अप्पा परचुरे,)

४) पु.ल. : एक साठवण (संपादक जयवंत दळवी).



Scanned by CamScanner